(७९)


# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४.(थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : mahamjp.com


जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-२/३५०/ ९४५

३१ ऑगस्ट, २०१५

## परिपत्रक क्र. १६४

**विषय :** नागरी / ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या तांत्रिक बदलांना मान्यता देण्याबाबत.

**संदर्भ :**

१. शासन परिपत्रक क्र.ग्रापापु.१००६/प्र.क्र.३४३/पापु.०६,दि.२४.११.२०० दि.२४.११.२००६
२. शासन शुध्दीपत्रक क्र. ग्रापापु-१००६/ प्र.क्र.३४३ / पापु.०६, दि.२५.१.२००७
३. शासन निर्णय क्र. पापुयो-२०१२/प्र.क्र.१७७/ पापु.१७, दि.२५.६.२०१४
४. शासन निर्णय क्र. पापुयो-२०१३/प्र.क्र.४७/पापु.१७, दि.२.६.२०१५

**<u>पार्श्वभूमी :</u>**

संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयानुसार प्रगती पथावरील पाणी पुरवठा योजनांमध्ये एखादे नवीन गांव/वाडी समोवश करावयाचे/वगळावयाचे झाल्यास त्याबाबत संबंधित जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस अधिकार देण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे त्यानुसार होणाऱ्या तांत्रिक बदलांना मान्यता देण्याचा अधिकार मुख्य अभियंता यांना होता. संदर्भ क्र. २ अन्वये योजनेत नवीन गांव/वाडी समाविष्ठ करण्याचे कारण वगळता, इतर कारणास्तव एखाद्या योजनेचे तांत्रिक बदलांमुळे योजनेच्या किमतीत वाढ होत नसेल अशा बाबतीत योजनेतील तांत्रिक बदलास मान्यता देण्याचा अधिकार मजीप्राच्या संबंधित मुख्य अभियंतांना देण्यात आलेले आहेत.

तथापि, सद्य:स्थितीत अनेक पाणी पुरवठा योजनांच्या प्रशासकीय मंजुरीच्या शासन निर्णयामध्ये योजनेत परस्पर तांत्रिक बदल करु नये अशा प्रकारच्या सूचना शासनाने

निर्गमित केल्या आहेत. (उदा.संदर्भ क्र. ३ व ४ मध्ये नमुदित प्रशासकीय मंजुरीच्या शासन निर्णयामध्ये तांत्रिक बदल परस्पर करु नये, अशा प्रकारचा उल्लेख आढळतो. )

क्षेत्रीय कार्यालयामार्फत योजनेत परस्पर अनेक तांत्रिक बदल करण्यात येतात. त्यामुळे योजनेच्या किंमतीत वाढ होतेच शिवाय योजनेच्या अंमलबजावणीमध्ये दिरंगाई होते. क्षेत्रीय कार्यालयामार्फत योजनेच्या तांत्रिक बदलांना मान्यता देताना तांत्रिक बदलांमुळे योजनेच्या खर्चात बचत होते का, योजनेच्या उर्जा खर्चामध्ये बचत होते का, योजनेच्या देखभाल व दुरुस्तीमध्ये सुलभता निर्माण होते का, इ. बाबी विचारात घेणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे तांत्रिक बदल केलेल्या अनेक योजनांच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे या योजना सुधारित कराव्या लागल्या आहेत. परिणामी, अनेक योजना रखडल्या आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेऊन ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा योजनांच्या तांत्रिक बदलास मान्यता देण्याच्या बाबतीत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

१. नागरी अथवा ग्रामीण योजनांच्या बाबतीत योजनेस प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर निविदा काढण्याच्या आधी कार्यव्ययी सर्वेक्षण करताना काही किरकोळ तांत्रिक बदल करावी लागल्यास व त्यामुळे योजनेच्या एकूण खर्चात वाढ होत नसल्यास त्या तांत्रिक बदलांना मुख्य अभियंता यांच्या स्तरावर मान्यता देऊन त्यानुसार कार्यव्ययी अंदाजपत्रकांनाही सक्षम अधिकाऱ्यांनी मंजुरी द्यावी. <u>तांत्रिक बदलास मंजुरी देताना योजनेचे उद्भव दैनंदिन पाणी पुरवठ्याचे प्रमाण इ. अशा धोरणात्मक बाबींमध्ये बदल होणार नाही, याची दक्षता घ्यावी.</u> तांत्रिक बदलामुळे तांत्रिक बदलांना मान्यता देताना तांत्रिक बदलांमुळे योजनेच्या खर्चात बचत होते का, योजनेच्या उर्जा खर्चामध्ये बचत होते का, योजनेच्या देखभाल व दुरुस्तीमध्ये सुलभता निर्माण होते का, इ. बाबी विचारात घ्याव्यात.

२. कार्यव्ययी सर्वेक्षणाअंती योजनेत उद्‌भव, दरडोई पाणी पुरवठ्याचे प्रमाण, पंपिग तास, पाईप लाईनच्या प्रकारात बदल इ. धोरणात्मक बदल करणे अत्यंत आवश्यक असल्याचे निदर्शनास आल्यास या प्रकरणी तांत्रिक बदालाअंती योजनेच्या एकूण खर्चामध्ये वाढ होत असो किंवा नसो शासनाची पूर्व परवानगी घेऊन तद्‌नंतरच या प्रकरणी पुढील कार्यवाही करावी.

३. कार्यव्ययी सर्वेक्षणाअंती योजनेत तांत्रिक बदल आवश्यक असल्याचे निदर्शनास आल्यास व त्यामुळे योजनेच्या एकूण खर्चात वाढ होत असल्यास तांत्रिक बदलास मुख्य

अभियंता त्यांच्या स्तरावर मंजुरी देऊ नये. अशा प्रकरणी तांत्रिक बदलास शासनाची पूर्व परवानगी घेऊनच पुढील कार्यवाही करावी.

वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. उपरोक्त निर्देशांची पालन न केल्याचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरुन शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

३१/८/१५

(संतोष कुमार)
सदस्य सचिव

मजीप्रा/सस/तांशा-२/३५०/ ९७५

दिनांक : ३१.०८.२०१५

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :

- संचालक (तांत्रिक), मजीप्रा, मुंबई
- संचालक (वित्त), मजीप्रा, सिडको भवन, नवी मुंबई
- मुख्य अभियंता, मजीप्रा,ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
- अधीक्षक अभियंता, मजीप्रा मंडळ, ठाणे/पनवेल/पुणे/सांगली/नाशिक/ अहमदनगर/ औरंगाबाद/ नांदेड/ लातूर/ अमरावती/ नागपूर/ चंद्रपूर/ अकोला
- अधिक्षक अभियंता, म.नि.सं.व सं.कक्ष/गु.प.प.,ठाणे.
  सदर परिपत्रक मजीप्राच्या वेबसाईटमध्ये अपलोड करावे.
- कार्यकारी अभियंता (सर्व)

TS-II-D- Jyoti